मुक्तागिरि

# छत्रपती शिवाजी कॉलेज एनसीसीच्या छात्र सैनिकांची चमकदार कामगिरी

**सातारा :** २२ महाराष्ट्रीयन एन.सी.सी. बटालियन सातारा आयोजित ३१९ निमल ट्रेनिंग कॅम्प कमांडींग ऑफिसर कर्नल दीपक ठोंगे आणि लेफ्टनंट कर्नल पराग गुप्ते यांच्या नेतृत्त्वाखाली दि. १३ ते १९ डिसेंबर रोजी महागाव येथे यशस्वी स्मप्पण झाला.

कॅम्पसाठी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून ४५१ छात्र सैनिक दाखल झाले होते. सात दिवसाच्या या प्रशिक्षण शिबिरात महाविद्यालयीन तरुणांना लष्करी प्रशिक्षण देऊन देश सेवेसाठी सक्षम बनविले जाते. कॅम्प कालावधीत आयोजित केलेल्या ड्रिल कॉम्पिटिशन, फायरिंग, खो -खो व टग ऑफ वार स्पर्धांमध्ये छत्रपती शिवाजी कॉलेजच्या छात्रसैनिकानी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव रोशन केले. सिनिअर अंडर ऑफिसर रोहित शिंदे, खुशी जांगिड यानी उत्कृष्ट कॅम्प कमांडर म्हणून नेतृत्व केले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कमांडिंग ऑफिसर कर्नल ठोंगे यांच्या हस्ते बेस्ट बेस्ट कॅम्प कमांडर, बेस्ट कॅडेट मेडल देऊन अभिनंदन केले. अंडर ऑफिसर रोहित शिंदे यांना बटालियन सिनिअर अंडर ऑफिसर रँक प्रदान करण्यात आली तर प्रतीक्षा धनवडे, जयश्री कदम,रेखा मोरे यानी विजयी खो खो संघात उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, एन.सी. सी.कंपनी कमांडर लेफ्टनंट केशव पवार, सुबेदार मेजर उदय पवार, यांनी अभिनंदन केले.

C M Y K